# छंद पुष्परचनेचा - २०

मागील काही महिने आपण फुलांच्या रांगोळ्या बघितल्या. या महिन्यापासून पुन्हा पाश्चात्य पुष्परचनेकडे वळू या. पाश्चात्य पुष्परचनेमधील गोल, "T" आकार, "L" आकार या प्रकारच्या रचना आपण बघितल्या. यावेळी त्रिकोणी आकारातील रचनेची माहिती घेऊ.



सोबत गुलाबी रंगाची गुलाबाची फुले व ग्लॅडिओली वापरुन केलेली रचना पाश्चात्य त्रिकोणी रचना प्रकारामध्ये येते. यात प्रथम पिवळ्या रंगाच्या ग्लॅडिओलीची फुले मध्यभागी लावली आहेत. पांढऱ्या पॉटच्या रुंदीच्या साधारण अडीचपट एवढी ग्लॅडिओलीच्या तुऱ्यांची उंची घेतली आहे. ग्लॅडीओलीची पानेही लावली आहेत. त्यानंतर सर्वात उंच असलेले गुलाबी रंगाचे फुल मध्यभागी लावून त्याच्या दोन्ही बाजूने थोडी खाली पुढची दोन गुलाबाची फुले लावली आहेत व पुढची गुलाबाची फुले उंची कमी कमी करत खालपर्यंत लावली आहेत. फुले लावतानाच मधे मधे ॲस्परॅगस व सदाफुलीची पाने लावली आहेत.

पॉट/व्हाज मोठ्या आकाराचे घेतल्यास त्यानुसार जास्त फुले वापरुन व उंच ग्लॅडिओली लावून मोठी रचना करता येते.

सौ. अरुंधती शिरीष देशपांडे
इकेनोबो इकेबाना, पुणे चॅप्टर
asdssd@gmail.com